CMYK

केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे कोणते मंत्रालय >>पान 2

छत्रपती संभाजी महाराजांचा युवकांनी आदर्श घ्यावा : आ. सिद्धार्थ खरात >>पान 3

वाकद ग्रामस्थांच्या उपोषणाला विविध संघटनांचा पाठिंबा >>पान 4

**सुविचार**

आत्मविश्वासाने व्यक्तिमत्त्वाला तेज मिळते.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




**विकी कौशलच्या 'छावा'नं बॉक्स ऑफिसवर रिलीजच्या चौथ्या दिवशी केली धमाकेदार कमाई...**

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 189 ■ बुधवार, दि. 19 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# राजन साळवींनंतर वैभव नाईकही उध्दव ठाकरेंची साथ सोडणार?

## भरत गोगावलेंच्या वक्तव्यानं भुवया उंचावल्या; ऑपरेशन टायगरच्या चर्चा

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : कोकणात शिवसेना ठाकरे गटाला गळती लागल्याचे दिसून येत आहे. माजी आमदार राजन साळवी यांनी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करून ठाकरेंना मोठा धक्का दिलाय. तर कोकणातील ठाकरेंच्या अनेक पदाधिकाऱ्यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली आहे. कोकणातील आमदार भास्कर जाधव आणि माजी आमदार वैभव नाईक हे दोन शिलेदार ठाकरेंकडे राहिलेले आहेत. उद्धव ठाकरेंकडून कोकणातील डॅमेज कंट्रोलसाठी प्रयत्न केले जात आहेत. वैभव नाईक यांनी सोमवारी उद्धव ठाकरे यांची भेट घेत त्यांच्याशी चर्चा केली आहे. आता भरत गोगावले यांनी वैभव नाईक यांच्याबाबत मोठा दावा केलाय.**

राजन साळवी यांच्या मागे एसीबीच्या चौकशीचा ससेमिरा लागला होता. त्यानंतर ते एक दोन वेळा उद्धव ठाकरे यांना भेटले आणि अखेर शिंदे गटात त्यांनी प्रवेश केला. तर दुसरीकडे वैभव नाईक यांच्या मागेदेखील एसीबी चौकशी ससेमिरा लागला आहे. वैभव नाईक यांनी देखील उद्धव ठाकरेंची भेट घेतल्याने चर्चांना उधाण आले आहे. मात्र उद्धव ठाकरेंची भेट घेण्याआधी त्यांनी आपण उद्धव ठाकरे यांच्यासोबतच सोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. आता यावरून भरत गोगावले यांनी मोठं भाष्य केले आहे.

ठाकरे गटाने ऑपरेशन टायगरची धास्ती घेतली आहे? ठाकरे गटाने लोकप्रतिनिधींची बैठक बोलावली आहे. याबाबत विचारले असता भरत गोगावले म्हणाले की, अशा मिटिंग जर त्यांनी अगोदरच घेतल्या असत्या तर ही वेळ आली नसती. परंतु ही वेळ आणून देण्याचं काम एकनाथ शिंदे साहेबांनी केले आहे. कारण एकनाथ शिंदे हे सामान्य माणसाचे नेते आहेत. ते काम करत आहेत त्यामुळे लोकांना विश्र्वास वाटत आहेत. त्यामुळेच लोक एकनाथ शिंदे यांच्याकडे येत आहेत. अनेक लोक अजूनही लाईनमध्ये आहेत. येत्या आठवड्याभरात कोकणामध्ये आमच्या पक्षात अनेक लोक येतील, असा विश्र्वास त्यांनी व्यक्त केला.



वैभव नाईक यांच्याबाबत विचारले असता भरत गोगावले म्हणाले की, वैभव नाईक यांच्याशी चर्चा सुरू आहे. सगळ्याच गोष्टी आम्ही उघडपणे सांगणार नाही. काही गोष्टी गुप्त ठेवाव्या लागतात. परंतु योग्य वेळेला तुम्हाला ते सांगितलं जाईल. वैभव नाईक यांची एसीबीची चौकशी सुरू आहे म्हणजे त्या आरोपी झाले असे होत नाही. ते चौकशीला सामोरे जातील आणि त्यातून काही निर्णय ते घेतील, असे त्यांनी म्हटले.

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा परिसरात दामिनी पथक नेमण्यात येणार -शिक्षणमंत्री दादा भुसे

**मुंबई/प्रतिनिधी :** शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी सरकार तत्पर आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा परिसरात दामिनी पथक नेमण्यात येणार आहे, अशी घोषणा शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी केलीय. तर महिला आणि बालकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यावर उपाययोजना आखण्यासाठी तरुणांचे नेतृत्व वाढवण्याची गरज आहे, त्यांच्या माध्यमातून कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल आणि त्याद्वारे बालकांना सुरक्षित करण्यास सहकार्य लाभेल, असा विश्वास विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी व्यक्त केलाय. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामार्फत 'बाल रक्षा अभियानाचा' शुभारंभ सह्याद्री अतिथीगृह येथे करण्यात आलाय. त्यावेळी गोऱ्हे आणि भुसे बोलत होते. यावेळी आयोगाच्या अध्यक्षा सुशीबेन शाह उपस्थित होत्या.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या जनजागृतीपर पोस्टरचे अनावरण, बालरक्षा अभियान प्रशिक्षण पुस्तिकेचे प्रकाशन, चिराग ॲपचे डिजिटल पद्धतीने अनावरण विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, आयोगाचे सदस्य चैतन्य पुरंदरे, जयश्री पालवे, सायली पालखेडकर, स्वयंसेवी संस्था >>पान २

# मदत करण्याचा बहाणा, २१ ज्येष्ठांना घातला गंडा; कर्नाटकच्या चोरट्याचा पुण्यात धुमाकूळ

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे पोलिसांनी एटीएम कार्ड बदलून ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करणाऱ्या एका आरोपीला अटक केली आहे. कर्नाटकमधील म्हैसूर येथील राजू प्रल्हाद कुलकर्णी (५४) असे या आरोपीचे नाव असून त्याच्याकडून १३ लाख ९० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल आणि १६६ एटीएम कार्ड्स जप्त करण्यात आली आहेत. एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठांना मदतीचा बहाणा करुन कुलकर्णी त्यांचे एटीएम कार्ड चोरायचा. त्यांच्याकडून पिन नंबर जाणून घ्यायचा. त्यानंतर कुलकर्णी एटीएममधून पैसे निघत नाही, असे सांगून ज्येष्ठांना त्याच्याकडील बाद झालेले एटीएम कार्ड द्यायचा. ज्येष्ठांकडील एटीएम कार्ड चोरुन तो पसार व्हायचा. एटीएम कार्डचा गैरवापर करुन तो पैसे काढून घ्यायचा, अशी माहिती परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत गांजवे चौकात २ फेब्रुवारी रोजी एका बँकेच्या एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठाची फसवणूक करण्यात आली होती. या गुन्ह्याचा तपास करण्यात येत होता. तांत्रिक तपासात आरोपी कुलकर्णीने ज्येष्ठाची फसवणूक केल्याचे उघडकीस आले. त्यानंतर कुलकर्णी कर्नाटकात पसार झाल्याची माहिती मिळाली.



पोलिसांच्या पथकाने त्याला कर्नाटकातून ताब्यात घेतले. अतिरिक्त पोलीस आयुक्त प्रवीणकुमार पाटील, उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक आयुक्त साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजयमाला पवार, गुन्हे शाखेचे निरीक्षक अरुण घोडके, उपनिरीक्षक मनोज बरुरे, अशोक माने, मयूर भोसले, सचिन कदम, गणेश काठे, आशिष खरात, अर्जुन थोरात, राहुल मोरे, संतोष शेरखाने, नितीन बाबर, सागर मोरे यांनी ही कामगिरी केली.

पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या संख्येने सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक राहायला आहेत. निवृत्ती वेतन महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जमा होत असल्याने कुलकर्णी शहरातील वेगवेगळ्या भागातील एटीएम केंद्रांबाहेर पाळत ठेवायचा. ज्येष्ठ नागरिक एटीएम केंद्रात पैसे काढण्यासाठी गेल्यानंतर तो त्यांच्या पाठापाठ एटीएममध्ये शिरायचा. हातचलाखी करुन तो त्याच्याकडील एटीएम कार्ड ज्येष्ठांना द्यायचा. ज्येष्ठांकडील कार्ड घेऊन तो त्यांच्या खात्यातून पैसे चोरायचा.

गुन्हा केल्यानंतर तो कर्नाटकात पसार व्हायचा.आरोपी राजू कुलकर्णी याने एटीएममधून पैसे काढणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक केली. त्याने विश्रामबाग, बिबवेवाडी, सिंहगड रस्ता, कोथरुड, विश्रांतवाडी, शिवाजीनगर, सहकारनगर, तसेच आळंदी परिसरात फसवणुकीचे १६ गुन्हे केल्याचे उघडकीस आले. कुलकर्णी याने फसवणुकीतून मिळालेल्या पैसे मैत्रिणीसोबत मौजमजा करण्यासाठी खर्च केल्याची माहिती पोलीस उपायुक्त संदीप सिंघ गिल यांनी दिली.

# शनि देवाच्या कृपेने डोणगाव शहरासह मतदारसंघातील विघ्न दूर होतील : खरात

**डोणगाव येथे शनि देवाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना**

**दैनिक आपला विदर्भ**





**डोणगाव/प्रतिनिधी :** दिल्लीनंतर देशातील दुसऱ्या क्रमांकाची उंच (११ फूट) व महाराष्ट्रातील सर्वात उंच शनीदेव मूर्तीची प्रतिष्ठापना डोणगाव येथे १८ फेब्रुवारी रोजी करण्यात आली. साक्षात शनिदेव डोणगाव येथे आल्याने डोणगाव व मतदार सगळे विघ्न दूर होतील, आणि मतदारसंघात सुख शांती लाभून मतदार संघाचा सर्वांगीण विकास होईल असे मत आमदार सिद्धार्थ खरात यांनी दैनिक आपला विविदर्भ बोलताना अप्रत्यक्षपणे विरोधकांना टार्गेट केले.

येथील श्री संताजी महाराज सेवाभावी ट्रस्टच्या वतीने शनिदेव मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली आहे. दिल्ली येथे २१ फूट उंच शनीदेव मूर्ती असल्याचा दावा केला जातो, तर त्यानंतर दुसऱ्या क्रमांकाची ११ फूट उंच मूर्ती डोणगाव येथे स्थापन करण्यात आली आहे. येथील शनीदेवाची मूर्ती राज्यस्थान येथून आणण्यात आली आहे.या मूर्तीची डोणगाव येथे धार्मिक विधी पूजा अर्चा करून प्राणप्रतिष्ठा करण्यात आलेली आहे. शनि देवाच्या मूर्तीचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले आहे. मनाला प्रसन्न वाटले असून साक्षात शनिदेवच डोणगाव येथे आल्याने डोणगाव व मेहकर मतदार संघातील विकासाची संदर्भात आलेले विघ्न दूर होत होतील. त्याचबरोबर मतदार संघातील जनतेला सुख समृद्धी लाभेल अशी प्रार्थना शनिदेव चरणी केली आहे असे म्हणत सिद्धार्थ खरात यांनी राजकीय कोपरखळी मारत विरोधकांना टार्गेट केले. मतदारसंघात आतापर्यंत आलेल्या विघ्नामुळे विकास झाला नाही, आता मात्र शनिदेवाच्या कृपेने हे विघ्न दूर होतील आणि शनिदेव यापुढेही विकास कामांमध्ये कोणतेही विघ्न येऊ देणार नाही असे म्हणत राजकीय कोपरखळ्या लगावल्या. यावेळी मात्र उपस्थितांमध्ये एकच हास्य पिकला. आमदार सिद्धार्थ खरात यांनी शनिदेवा प्रति आदर व्यक्त करत मतदार संघातील शनिदेवांनी आलेले विघ्न दूर करावे अशी प्रार्थना केली असली तरी आमदार सिद्धार्थ खरात यांच्या या वाक्याबाबत मात्र राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. तर एक प्रकारे विरोधकांनाही टार्गेट केले असल्याची चर्चा मतदारसंघात रंगत आहे.




CMYK

## शिवरायांचे महिला विषयक धोरण आणि आजची स्थिती

रांझ्याच्या पाटलाने बलात्कार केल्याचे समजताच त्याचे हातपाय तोडून चौरंग केला. आज मात्र माता भगिनींची अब्रू लुटणारे हजारो नराधम न्यायालयाच्या छत्राखाली स्वतःला वाचवण्यासाठी धडपडत आहेत ! म्हणून आजही शिवरायांच्या स्वराज्याची छाप प्रत्येकाच्या श्वासाश्वासात आहे. चार वर्षांपूर्वी हिंगणघाट येथे एकतर्फी प्रेमातून प्राध्यापिका असलेल्या तरुणीला एका नराधमाने जिवंत जाळल्याची घटना असो की कोपर्डीच्या बहिणीची झालेली निर्घृण हत्या असो की अगदी काल परवा बदलापुरात झालेला चिमुरडी वरील अत्याचार ! या सर्व घटनांनी संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला होता. केवळ याच घटना नाही तर यासारख्या अनेक घटना रोजच या पावन भूमीत घडत आहेत. महिलांच्या अब्रूची लक्तरे वेशीवर टांगली जात आहे. आज या पावन भूमीत कोणतीच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. नराधमांना कायद्याचा धाक नाही. नराधमांना अटक होते त्यांना फाशीची शिक्षा व्हावी म्हणून जनतेतून उठाव होतो. मोर्चे निघतात. अनेक वर्ष न्यायालयात खटला चालतो. या नराधमांना फाशी होईल अशी अपेक्षा असताना त्यांना जन्मठेपेची शिक्षा होते आणि ही शिक्षाही रद्द व्हावी यासाठी हे नराधम वरच्या न्यायालयात अपील करतात. दररोजचे वर्तमानपत्र चाळलं तर त्यात विनयभंग, छेडछाड, बलात्काराची एकतरी बातमी दिसतेच. आजूबाजूला घडणाऱ्या महिलांविरोधी गुन्ह्यांच्या घटना पाहिल्या की शिवरायांच्या विचारांची, शिवरायांच्या धोरणाची कधी नव्हे इतकी गरज आज असल्याचे जाणवते. कारण शिवरायांच्या शिवशाहित महिला जितक्या सुरक्षित होत्या तितक्या त्या कोणत्याच काळात नव्हत्या. कारण शिवरायांचे महिला विषयक धोरण. मध्ययुगीन काळात शिवरायांचा जन्म झाला. या काळात महाराष्ट्र परकीयांच्या गुलामगिरीत होता. शिवरायांनी महाराष्ट्राला परकीयांच्या गुलामगिरीतून मुक्त करून हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याचा संकल्प केला. मराठी माणसांच्या मनात अस्मिता निर्माण केली. अठरापगड जातींना एकत्र करून त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. यात सर्वात मोठे कार्य म्हणजे महिलांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सुधारणा, नियम आणि उचललेले कठोर पावले. त्यांचे हे पाऊल म्हणजे महिला मुक्तीसाठी केलेली क्रांतीच होती. हजारो वर्षांपासून चालू असलेल्या अनिष्ठ चालीरीती बदलण्याची धमक कोणत्याच राजाने दाखवली नाही, ती धमक शिवरायांनी दाखवली. त्यांनी स्वतःच्या आईला सती जाण्यापासून परावृत्त केले ही त्याकाळातील सामाजिक क्रांतीच होती. त्याकाळी महिलांना गुलामीची वागणूक दिली जात होती. महिलांची खरेदी – विक्री केली जात होती. महिलांना गुलाम म्हणून वागवले जात होते. शिवरायांनी या सर्व गोष्टींवर बंदी आणली. शिवरायांचे महिलाविषयक धोरण अत्यंत आदराचे होते. जिजामाता या शिवरायांच्या गुरू होत्या. जिजामातेनेच त्यांना स्त्री जातीच्या सन्मानाचे बाळकडू पाजले म्हणूनच पर स्त्री मातेसमान मानणारा व शत्रूच्या स्त्रियांना सन्मान देणारा युगपुरुष म्हणून शिवरायांची इतिहासात नोंद झाली. शिवराय खऱ्या अर्थाने रयतेचे राजे होते. रक्षणकर्ते होते. सैन्याला राजांचे सक्त आदेश होते. स्त्रियांना मोहिमेवर आणू नये, त्यांना युद्धात पकडू नये. स्त्री संबंधी गुन्ह्याला क्षमा नव्हतीच उलट कठोर शिक्षा होती, मग तो कोणीही असो. साधा शिपाई, वतनदार, किल्लेदार, कुणालाही माफी नव्हती. हातपाय तोडणे, देहदंड अशा कठोर शिक्षा दिल्या जात. रांझ्याच्या पाटलाने गरीब शेतकऱ्याच्या तरुण मुलीला उचलून नेऊन भोगली. त्या तरुण मुलीने आत्महत्या केली. जेंव्हा ही गोष्ट शिवरायांना समजली तेंव्हा शिवरायांनी त्याच्या मुसक्या बांधून त्याला पुण्याला आणले. त्याचे हातपाय तोडण्याची शिक्षा दिली. जी गोष्ट रांझ्याच्या पाटलाची तीच गोष्ट कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेची. तीच गोष्ट सकूजी गायकवाड या सेनापतीची. महिलांसबंधी गुन्ह्याला त्यांच्याकडे क्षमा नव्हती उलट कडक शिक्षाच होती. शिवरायांच्या या महिलाविषयक धोरणामुळेच महिला सुरक्षित होत्या. आजची परिस्थिती मात्र पूर्ण भिन्न आहे. महिला अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. महिलांना सुरक्षा पुरवण्यात सरकार अपयशी ठरत आहे. कायदे असूनही त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. त्यामुळे गुन्हेगारांना कायद्याचा धाक उरला नाही. राज्यकर्त्यांनी शिवरायांच्या महिलाविषयक धोरणांचा अभ्यास करुन ते राबवण्याचा प्रयत्न केल्यास देशात शिवशाही अवतरल्याशिवाय राहणार नाही.

पान १ वरून...

## विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी शाळा परिसरात दामिनी पथक नेमण्यात येणार -शिक्षणमंत्री दादा भुसे

विधायक भारतीचे संतोष शिंदे, समतोल फाउंडेशनचे विजय जाधव, प्रथम संस्थेचे किशोर भामरे, विपला फाउंडेशनचे प्रवीण कदम, अवर सचिव वंदना बोत्रा, वंदना भोसले यांच्यासह अधिकारी, समाजसेवी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.


पालक–शिक्षण समितीचे ऑनलाईन मॉनिटरिंग : बालकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल, अशी माहिती उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी दिलीय. प्रत्येक शाळेत नेमण्यात आलेल्या पालक–शिक्षण समितीचे ऑनलाईन मॉनिटरिंग करण्यात येणार आहे. मुलांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी त्यांचे समुपदेशन करणे आवश्यक आहे आणि हेच समुपदेशन समवयस्क मुलांमार्फत झाल्यास ते नक्कीच प्रभावी ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.


शासन आयोगास सर्व सहकार्य करेल : लहान बालकांच्या समस्यांबाबत तक्रारी नोंदवायच्या असतील तर चिराग ॲपद्वारे त्या नोंदविता येतील, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी दिलीय. या माध्यम ातून ग्रामीण भागातील आणि शहरी भागातील प्रत्येक शाळांमधील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडवण्यासाठी शासन आयोगास सर्व सहकार्य करेल, अशी ग्वाही त्यांनी दिली. शिक्षकांनाही प्रशिक्षण देण्यात येईल, सखी सावित्री समितीचा विस्तार करण्यात येणार आहे. पोक्सो कायद्यात अधिक कठोर तरतूदी करण्यात येणार असून, यासाठी सामाजिक संस्थांशी समन्वय साधणार असल्याचे भुसे यांनी सांगितले.

# केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे कोणते मंत्रालय

## कौन बनेगा करोडपतीच्या प्रश्नमंजुषीमध्ये अभिताभ बच्चन यांनी हॉटसीटवरील स्पर्धकाला विचारला प्रश्न

दैनिक आपला विदर्भ






**बुलढाणा/प्रतिनिधी :** कर्तुत्वाला नेतृत्वाची साथ मिळाली तर नेतृत्व नावारूपाला येतं हा प्रत्यय आलाय कोण बनेगा करोडपती या प्रश्नमंजुषा शो मध्ये केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे कोणत्या मंत्रालयाचा कारभार आहे हा प्रश्न विचारण्यात आला होता. बुलढाणा जिल्ह्यातील भूमिपुत्रांने आयुष मंत्रालयात गेल्या ९ महिन्यात केलेल्या कामाची ही पावती असून बुलढाणेकरांसाठी ही गौरवाची बाब आहे.

बुलढाणा लोकसभा मतदारसंघातून सलग चौथ्यांदा निवडून आलेले खासदार प्रतापराव जाधव यांचे नाव केंद्रीयमंत्री पदासाठी शिवसेनेचे मुख्यनेते एकनाथराव शिंदे यांनी पुढे केले ९ जुन २०२४ ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळामध्ये पहिल्यांदाच प्रतापराव जाधव यांनी मंत्री म्हणून शपथ घेतली त्यांच्याकडे आयुष मंत्रालयाचा स्वतंत्र पदभार देण्यात आला गेल्या नऊ महिन्याच्या कार्यकर्तित आयुष मंत्रालयअंतर्गत विविध कार्यक्रम राबविले यामध्ये संविधानदिन २६ नोव्हेंबर ते २६ डिसेबर अटल बिहारी वाजपेयी यांच्या १०० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण देशामध्ये देश का प्रकृती अभियान राबविण्यात आले. एक महिन्याच्या कालावधीत या अभियानांतर्गत एक कोटी ५० लाखाच्या जवळपास देशातील नागरिकांचे प्रकृती परीक्षण करण्यात आलंय याशिवाय आयुर्वे द, युनानी, योगा आयुष विभागार्गत देशातर्गत भरीव काम केल्या जात आहे त्यामुळेच सोनीवरील लोकप्रिय ठरलेला प्रश्नमंजुषा शो अर्थात कोण बनेगा करोडपती या कार्यक्रमात १७ फेबुवारीला केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे कोणत्या मंत्रालयाचा पदभार आहे हा प्रश्न सिने अभिनेता अमिताभ बच्चन यांनी विचारला होता .बुलढाणा जिल्ह्याचे भूमिपुत्र केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कार्याची दखल या कार्यक्रमात घेण्यात आली ही बुलढाणा जिल्ह्यातील प्रत्येक नागरिकांसाठी गौरवाची गोष्ट आहे कर्तुत्वाला जेव्हा नेतृत्वाची साथ मिळते तेव्हा ते नेतृत्व फुलते आणि फुललेले नेतृत्व सर्वत्र बहारते हे या निमित्याने समोर आलायं.

## अमरावती शहरात चैन स्नॅचिंग करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

**२१ गुन्हे उघडकीस, ८ लाख रूपये किंमतीचे १०० ग्रॅम सोने जप्त**



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :**अमरावती शहर गुन्हेशाखा युनिट – २ ने मोठी कारवाई करत आंतरराज्यीय चैन स्नॅचिंग करणाऱ्या टोळीतील दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत २१ जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत, तसेच आरोपींकडून ८ लाख रुपये किमतीचे १०० ग्रॅम सोने जप्त करण्यात आले आहेत.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी पत्रकार परिषद घेत या बाबींची माहिती दिली. त्यांनी सांगितले की, ३ जानेवारी २०२५ रोजी गाडगेनगर पोलिस स्टेशन येथे एका नागरिकाने तक्रार दिली होती की, त्याच्यावर दुचाकीवरून आलेल्या दोन इसमांनी चैन स्नॅचिंग केली. तपास सुरू केल्यानंतर, गुन्हे शाखेने तांत्रिक विश्र्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त बातम्यांवर आधारित तपास सुरू ठेवला. तपासादरम्यान, आरोपी हसन अली उर्फ आशु नियाझ अली (वय २१), रा. भुसावळ आणि शेख जुबेर शेख निसार (रा. अमरावती) यांचा सहभाग उघड झाला. हसन अलीने आपल्या साथीदारांसोबत अमरावती आणि इतर जिल्ह्यात चैन स्नॅचिंगच्या घटना केल्या असल्याची कबुली दिली. शेख जुबेरने आरोपींना शहरातील स्थानांची माहिती दिली आणि त्यांना आश्रय देखील दिला. पोलीस आयुक्त रेड्डी यांनी सांगितले की, या कारवाईसाठी पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वाखाली असलेल्या पथकाने उत्कृष्ट कामगिरी केली. तपासाच्या वेळी तांत्रिक विश्र्लेषण, गुप्त माहिती आणि सीसीटीव्ही फुटेजचा उपयोग करण्यात आला, ज्यामुळे आरोपींची ओळख पटली आणि कारवाई शक्य झाली. अद्याप इतर आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे. पोलीस आयुक्त यांनी या कृत्यांची निंदा केली आणि पोलिस दलाने घेतलेल्या कार्यवाहीवर विश्र्वास व्यक्त केला.पत्रकार परिषदेत पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपायुक्त कल्पना बारावकर, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, उपायुक्त सागर पाटील आदी उपस्थित होते.

## विकी कौशलच्या 'छावा'नं बॉक्स ऑफिसवर रिलीजच्या चौथ्या दिवशी केली धमाकेदार कमाई...

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता विकी कौशलचा ऐतिहासिक नाट्यमय चित्रपट 'छावा' बॉक्स ऑफिसवर सध्या धुमाकूळ घालत आहे. या चित्रपटाची क्रेझ कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. लक्ष्मण उतेकर दिग्दर्शित या चित्रपटानं २ दिवसांत जगभरात १०० कोटींचा टप्पा ओलांडला. यानंतर 'छावा' हा पहिल्याच आठवड्यात १०० कोटींपेक्षा जास्त कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत सामील झाला. देशांतर्गत या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर 'फायटर' सारख्या चित्रपटांना मागे टाकले आहे. दरम्यान सोमवार १७ फेब्रुवारी रोजी 'छावा'च्या कमाईत घट झाली असली तरी, चित्रपटाने दुहेरी अंकी बॉक्स ऑफिसवर कमाई केली आहे.

'छावा'चं कलेक्शन एकूण : १४ फेब्रुवारी रोजी बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झालेल्या विकी कौशल आणि रश्मिका मंदान्ना स्टारर 'छावा' या चित्रपटानं पहिल्या दिवशी ३३.१० क कोटी रुपयांची कमाई केली. दुसऱ्या दिवशी चित्रपटानं ३९.३० कोटी रुपयांची कमाई करून प्रेक्षकांची मने जिंकली. रविवारी 'छावा'ची क्रेझ खूप दिसून आली आहे. तिसऱ्या दिवशी या चित्रपटानं ४९.०३ कोटी रुपयांचा व्यवसाय केला. तीन दिवसांत देशांतर्गत बॉक्स ऑफिसवर 'छावा'नं १०० कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला. पहिल्याच आठवड्यात 'छावा'नं भारतात एकूण १२१.४३ कोटी रुपयांचा गल्ला जमवला. 'छावा' हा चित्रपट लक्ष्मण उतेकर यांनी दिग्दर्शित केला आहे.

चौथ्या दिवसाचं कलेक्शन : मिळालेल्या माहितीनुसार, 'छावा' चित्रपटानं चौथ्या दिवशी २४.०० कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाची एकूण कमाई १४५.४३ कोटी झाली आहे. आता येणाऱ्या दिवसांमध्ये हा चित्रपट २०० कोटीचा टप्पा पार करेल अशी अपेक्षा केली जात आहे. 'छावा' चित्रपटात विकी कौशल आणि रश्मिका मंदान्ना व्यतिरिक्त अक्षय खन्ना, दिव्या दत्ता, आशुतोष राणा, डायना पेंटी, संतोष जुवेकर, दिव्या दत्ता, प्रदीप राम सिंह रावत, आलोक नाथ हे कलाकारही आहेत. या चित्रपटात अक्षय खन्नानं औरंगजेबाची भूमिका केली आहे. अनेकांना अक्षय खन्ना आणि विकी कौशलचा अभिनय आवडला आहे. हा चित्रपट पाहून अनेकजण भावूक होताना चित्रपटगृहांमध्ये दिसत आहेत.

# आचार्य विद्यासागरजी महाराज यांच्या प्रथम स्मृती महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

दैनिक आपला विदर्भ



**शिरपूर जैन/प्रतिनिधी :** आचार्य श्री विद्यासागर जी महाराज यांच्या प्रथम समाधी स्मृती महोत्सवाचे दि. १८ ते २० फेब्रुवारी दरम्यान विविध कार्यक्रमाचे आयोजन शिरपूर येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने दिगंबर समाज बांधवांनी उपस्थित राहावे व या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आव्हान आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

आचार्य श्री विद्यासागर जी महाराज यांच्या प्रथम समाधी स्मृती महोत्सवानिमित्त दिनांक १८ फेब्रुवारी रोजी विराट विद्यासागर पार्कचे उद्घाटन तथा भगवान महावीर का अचेलक धर्म या पुस्तकाचे विमोचन करण्यात येणार आहे. तसेच श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १९ फेब्रुवारी रोजी शिरपूर पार्श्र्वनाथ विधान, विद्या दयोदय गौशाळेत उद्घाटन करण्यात येणार आहे. तसेच हृदयरोग रोग तपासणी शिबिर वृक्षारोपण व संस्कार सागर आचार्य विद्यासागर स्मृती विशेषांक या पुस्तकाचे विमोचन करण्यात येणार आहे. दिनांक २० फेब्रुवारी रोजी शांतिनाथ विधान व विद्यासागर स्मृति चित्र प्रदर्शनी, सुवर्ण प्राशन आयुर्वेद चिकित्सा शिबिर, युग निर्माता महापुरुष ग्रंथ व सर्वोदयी संत की राष्ट्रीय देशना या दोन ग्रंथाचे विमोचन करण्यात येणार आहे. तसेच जैन विद्या संस्कृती प्र'यनमंजुषा २०२४–२५ चा निकाल जाहीर करण्यात येणार आहे.

यासाठी प्रथम पुरस्कार एक लक्ष रुपये माया गजेंद्र जैन इंदोर यांच्याकडून देण्यात येणार आहे. द्वितीय पुरस्कार ५१ हजार रुपये मणी आझाद मोदी इंदौर यांच्याकडून तर तृतीय पुरस्कार ३१ हजार रुपये नीरज जैन दिल्ली यांच्याकडून देण्यात येणार आहे.

सदर कार्यक्रमासाठी मंगल सानिध्य मुनीश्री वृषभ सागर जी महाराज, मुनीश्री अभिनंदन सागर जी महाराज, मुनिश्री सुपास्वर सागर जी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये येलक श्री सिद्धांतसागर जी महाराज यांच्या प्रेरणेतून या कार्यक्रमाचे सकल दिगंबर जैन समाज शिरपूर, अंतरिक्ष स्वामी दिगंबर दिन संस्थान शिरपूर, जिनवाणी महिला मंडळ शिरपूर, दिगंबर जैन तीर्थरक्षा संघर्ष समिती यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचा हजारो समाज बांधवांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### कंपनी तुपाशी आणि आरोग्य मित्र उपाशी




दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** आरोग्य प्रशासनाला सहकार्य म्हणून काम करणाऱ्या आरोग्य मित्राच्या विविध मागण्यांसाठी आज राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. कोल्हापुरात देखील आरोग्य मित्र संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आलीतं.यावेळी कंपनी तुपाशी आणि आरोग्य मित्र उपाशी अशी अवस्था आरोग्य मित्रांची झाली आहे. त्यामुळे आरोग्य मित्रांना पगारवाढ मिळावी.. शासनाकडून विविध योजना मिळाव्यात.अशा मागण्या यावेळी करण्यात आल्यातं.या आंदोलनात जिल्ह्यातील आरोग्य मित्र मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### ६५ बेकायदा इमारती प्रकरणी दीपेश म्हात्रे यांनी घेतली केडीएमसी आयुक्त इंदूराणी जाखड यांची भेट



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** हजारो कोटींचे उत्पन्न बुडाले, दोन हजार कोटींचे बँकेचे लोन आणि १०० कोटी रुपये पंतप्रधान आवास योजनेचे गेले. खोटे कागदपत्रांच्या आधारे हजारो कोटींचा घोटाळा झाला. या खोटी कागदपत्रे तयार करणाऱ्या टोळीचा म्होरक्या पोलिस प्रोटेक्शनमध्ये फिरतोय ही दुर्दैव आहे. सर्वात आधी अशा लोकांवर कारवाई झाली पाहिजे, अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांनी केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे. आज ६५ बेकायदा इमारतीमधील नागरिकांसह केडीएमसी आयुक्त इंदूराणी जाखड यांची भेट घेतली. यावेळी आयुक्तांनीही महापालिकेचे अधिकारी असतील तर त्यांच्या विरोधात कारवाई केली जाईल असे आश्र्वासन दिले आहे. ठाकरे गटाच्या गौप्य स्फोटामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

### पाणी प्रश्र्नासाठी ग्रामपंचायत सदस्य बसले उपविभागीय कार्यालयासमोर उपोषणाला




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** भटाना मध्यम प्रकल्पात मोठ्या प्रमाणात विद्युत पंपाच्या सहाय्याने पाणी उपसा सुरू आहे. याच प्रकल्पातून शिऊर गावातील नागरिकांसाठी पाणी पुरवठा केला जातो. येणाऱ्या काळात असाच पाणी उपसा सुरू राहिला तर शिऊर गावाला पाणीटंचाईला सामोरे जावे लागू शकते म्हणून हा उपसा बंद करण्यात यावा व पाठ बंधारे विभागाचे शाखा अभियंता यांनी या बाबी कडे दुर्लक्ष केल्याने त्यांच्यावर कारवाई व्हावी या मागणी साठी दोन दिवसांपासून शिऊर येथील ग्रामपंचायत सदस्य बाळा पाटील जाधव हे उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसले आहेत. प्रशासनाने त्यांना लेखी आश्वासन दिल्यानंतर त्या उपोषण मागे घेऊ असे यावेळी सांगितले.

### तीन महिन्यापूर्वी लावला बालविवाह; नवरदेव, भटजीसह १५८ जणांवर गुन्हा दाखल

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** अल्पवयीन मुलीचं लग्न लावल्या प्रकरणी तीन महिन्यांनी तब्बल १५८ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्या नवरदेव, त्याचे कुटुंबीय यांच्यासह भटजी, मंडप व्यावसायिक आणि वऱ्हाडी मंडळींचा समावेश आहे. गंगापूर तालुक्यातील भेंडाळा इथे १३ नोहेंबर रोजी हा विवाह पार पडला. मात्र सबळ पुरावे नसल्याने गुन्हा दाखल करण्यात अडचणी आल्या. मात्र तीन महिन्यांच्या परिश्रमानंतर अखेर बाल विवाह अधिकारी यांच्या तक्रारीनंतर गंगापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.पैठण तालुक्यातील सनी भालेराव या युवकाचा विवाह भेंडाळा इथल्या १५ वर्षीय मुलीसोबत निश्चित करण्यात आला. मात्र विवाह करताना नवरीच्या वयाचा सासरच्या किंवा तिच्या कुटुंबीयांनी विचार केला नाही.

# छत्रपती संभाजी महाराजांचा युवकांनी आदर्श घ्यावा : आ. सिद्धार्थ खरात

## अंजनी खुर्द येथे छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण



**लोणार/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजी महाराज म्हणजे चालते बोलते विद्यापीठ . जगायचे कसे, काय योग्य, काय अयोग्य, कोणता निर्णय कधी घ्यायचा अशी चाणाक्ष बुद्धी लाभलेले प्रेरणादायी व्यक्तिमत्व आहे. संपूर्ण आयुष्य रयतेच्या हितासाठी रणांगणात खर्च करणारे आणि धर्मासाठी स्वराज्यासाठी जीवाची बाजी लावणारे जगाच्या पाठीवरील एकमेव राजा आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांचे नाव घेतले तर एक शरीरात वेगळी ऊर्जा निर्माण होते, असे हे अखंड ऊर्जाचे स्तोत्र असलेले छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श युवकांनी घ्यावा, असे आवाहन आमदार सिद्धार्थ खरात यांनी केले.

अंजनी खुर्द येथे १६ फेब्रुवारी रोजी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याचे अनावरण आमदार सिद्धार्थ खरात यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते. तसेच यावेळी त्यांनी महाराजांच्या पुतळाच्या सौंदर्यी करणासाठी पाच लाख रुपयांचा निधी जाहीर करून यापुढेही मदत करण्याचे आश्र्वासन दिले.

यावेळी आमदार सिद्धार्थ खरात म्हणाले की, छत्रपती संभाजीराजे जसे तलवारबाजीमध्ये निपुण होते, तसेच ते ज्ञानक्षेत्रात अर्थात साहित्य क्षेत्रातदेखील निपुण होते. त्यांचे संस्कृत, हिंदी, मराठी इत्यादी भाषांवर प्रभुत्व होते. चरित्र्यसंपन्न, निर्व्यसनी, पराक्रमी राजा म्हणून संभाजीराजांचा लौकिक सर्वत्र होता. त्यांच्या शौर्याला, धैर्याला, त्यागाला जगाच्या इतिहासात तोड नाही, छत्रपती संभाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास हा प्रेरणेचा अखंड स्त्रोत आहे. ज्या अज्ञात मंडळींनी छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याची प्रस्थापना केली. त्यांच्या कार्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतो. छत्रपती संभाजी महाराजांच्या पुतळ्याने अंजनी गावाच्या वैभवात भर पडली असून हे निश्चितच कौतुकास्पद आहे. या प्रसंगी अमोल अवसरमोल, हनुमान भोकरे, अभिषेक मिसाळ, ज्ञानेश्र्वर ठेंग,निखिल गायकवाड, अमर भोकरे,मयूर गायकवाड,हर्षल गायकवाड,राहुल गायकवाड,गणराज गायकवाड,स्वप्निल टेकाळे,ऋतिक धुळे,सचिन काळदाते,रामेश्वर चौधरी यांच्यासह अंजनी खुर्द ग्रामस्थांची उपस्थिती होती.

### लागेल ती मदत करण्याचे आमदाराचे आश्वासन

महापुरुषांचे प्रेरणादायी पुतळे सजग आणि सुंदर दिसावे, यासाठी मी प्रयत्नरत असल्याचे आ. सिद्धार्थ खरात यांनी सांगितले. अंजनी खुर्द येथील संभाजी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभीकरण आणि सौंदर्यीकरणासाठी ५ लाखाचा निधी आमदार सिद्धार्थ खरात यांनी जाहीर केला. या विभागाच्या लोकप्रतिनिधी म्हणून यापुढेही लागेल ती मदत करण्याचे त्यांनी अंजनी खुर्द ग्रामस्थांना आश्वासन दिले.

# शिवजयंतीच्या पूर्वसंध्येला बुलढाण्यात निघाली भव्य मोटारसायकल रॅली



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** शिवजयंतीसाठी बुलढाणा नगरी सज्ज झाली असून, त्यानिमित्ताने १४ फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारी पर्यंत शहरात विविध कार्यकमांचे आयोजन करण्यात आले आहे.

१८ फेब्रुवारी रोजी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने शिवज्योत मोटरसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

या शिवज्योत मोटरसायकल रॅलीला बुलढाणा शहरातील सहकार विद्या मंदिर शाळेजवळ सुरुवात करण्यात आली. तर, छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ समारोप करण्यात आला. शिवजयंतीमध्ये विविध जाती, धर्म, पंथ, पक्ष आणि सामाजिक संघटनांना सहभागी व्हावे असे आवाहन छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे वतीने अध्यक्ष राजेंद्र काळे व आमदार संजय गायकवाड यांनी केले आहे.

# सैलानी यात्रा महोत्सवाचे नियोजन करावे पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांच्या सूचना

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला पूर्व तयारीचा आढावा




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा तालुक्यातील पिंपळगाव सराई येथे सैलानी बाबा यात्रा महोत्सव दि. ८ ते २३ मार्च या कालावधीत साजरा होणार आहे. या यात्रा महोत्सवात आवश्यक सोयीसुविधांचे सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत.

त्यानुषंगाने जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी सोमवारी त्यांच्या कार्यालयात यात्रेच्या पूर्व तयारीची समन्वय सभा घेतली. या बैठकीत मुख्य कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, पोलीस अधीक्षक विश्र्व पानसरे यांच्यासह विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री ना. मकरंद पाटील यांनी सैलानी यात्रा महोत्सवात भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा, शौचालय, परिसर स्वच्छता, पोलिस बंदोबस्त आदी सोयीसुविधा उपलब्ध करण्याच्या सूचना दिल्या. त्या पार्श्र्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी आढावा घेत म्हणाले की, या यात्रेत देशभरातून ४-५ लाख भाविक सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यानुषंगाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सीसीटिव्ही कॅमेरे बसवणे, महिला सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना करणे, विद्युत सुविधा पुरविणे, स्वच्छता गृह तयार करणे, पार्किंग व्यवस्था निर्माण करणे, सार्वजनिक शौचालय उभारणे, अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित ठेवणे, पोलीस बंदोबस्त, बॅरिकेट्स, आरोग्य कक्ष व औषधींचा साठा उपलब्ध करण्याच्या सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

# आरोग्य मित्रांचे बेमुदत संप सुरु; जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या

दैनिक आपला विदर्भ

### ■ किमान वेतन व शासकीय सेवेत समायोजनाची केली मागणी ■ दिवसभरात प्रशासनाकडून कसलीही दखल नाही

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील आरोग्यमित्र कायदेशिर नोटीस देवून आपल्या मागण्यांसाठी वेळोवेळी चर्चा संबंधित विभागाशी करतात. परतू, वेळोवेळी प्रयत्न केल्यानंतरही, यासंदर्भात कुठल्याही प्रकारचा न्याय मिळालेला नाही. यामुळे जिल्ह्यातील ३८ आरोग्य मित्रांनी दि. १८ फेब्रुवारी रोजी पासून बेमुदत संप पुकारला असून दररोज सकाळी १० ते ६ पर्यंत धरणे आंदोलन करणार आहेत. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे धरणे आंदोलन सुरू असल्याचे महाराष्ट्र आरोग्यमित्र कर्मचारी संघटनेच्या आरोग्य मित्रांनी सांगितले आहे.

महाराष्ट्र आरोग्यमित्र कर्मचारी संघटनेच्या वतीने राज्यव्यापी संपांतर्गत धरणे आंदोलने करण्यात येत आहेत. या संपात एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे आरोग्य मित्र यांच्या विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. यामध्ये आरोग्यमित्रांना दरमहा रु. २६,००० वेतन देण्यात यावे व किमान वेतन कायद्यानुसार स्पेशल अलाउन्स तथा महागाई भत्ता देण्यात यावा. वेतनात दरवर्षी १० टक्के वाढ करण्यात यावी. सर्व आरोग्यमित्रांना आजारपणाच्या रजा (एस.एल.) १०, किरकोळ रजा (सि.एल.) १०, विशेष अधिकार रजा (पी.एल.) ३०, सणाच्या सुट्या १० लागू कराव्यात. ॲपरॉन ऐवजी फॉर्मल ड्रेस देण्यात यावा. ई.एस.आय.सी मधील त्रुटींची पूर्तता लवकारात लवकर करून सर्व आरोग्यमित्रांना ई.एस.आय.सी. कार्ड देण्यात यावे. आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे सन २०१८ पासून विना वेतन करीत आहेत. सन २०१८ पासून जॉयनिंग लेटर व मोबदला देण्यात यावा. व जॉयनिंग लेटरवर एकत्रित महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना असा उल्लेख असावा. आरोग्यमित्रांचे इतर जिल्हयात व तालूक्याच्या ठिकाणी बदलीचे धोरण रद्द करावे. टी.पी.ए. बदलल्यानंतर नविन टी.पी.ए. मार्फत आरोग्यमित्र काम करतात परंतु ५ वर्षापेक्षा जास्त सेवा होउनही आरोग्यमित्रांना उपदान दिले नाही तरी सदरचे उपादन देण्यात यावे. आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.



**आरोग्य विषयीच्या महत्त्वपूर्ण योजनांचा कणा आरोग्यमित्र आहे या कनाला सांभाळायचे काम शासनाने करावे तसेच या आरोग्य मित्रांना किमान वेतन देण्यात यावे. याशिवाय कोविड सारख्या जागतिक महामारीत केलेल्या कामाचा मोबदला / जोखीम भत्ता देण्यात यावे. जोपर्यंत आमच्या या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आमचे धरणे सुरू राहणार आहे.**

# वाकद ग्रामस्थांच्या उपोषणाला विविध संघटनांचा पाठिंबा

दैनिक आपला विदर्भ

**वाशीम/प्रतिनिधी : जलजीवन मिशनचे काम पूर्ण करण्यात न आल्याने गावात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लाखो रुपयांचा खर्च करूनही जलजीवन मिशनचे काम पूर्ण न करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी रिसोड तालुक्यातील वाकद येथील ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामस्थांनी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर १० फेब्रुवारीपासून साखळी उपोषण सुरू केले आहे. सदर उपोषणाला लहुजी क्रांती सेना महाराष्ट्र नवनिर्माण सेना वंचित बहुजन आघाडी आधी संघटनांच्या वतीने पाठिंबा देत जोशी अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करण्याची मागणी केली आहे.**



रिसोड तालुक्यातील वाकद येथे भीषण पाणीटंचाई निर्माण होते. या पाणीटंचाईवर मात करण्यासाठी शासनाकडून लाखो रुपयांचा निधी खर्च करून जलजीवन मिशनतंर्गत पाणी पुरवठा करण्याचे काम करण्यात येत आहे. मात्र, सदर काम करणाऱ्या कंत्राटदाराने जलजीवन मिशनचे काम अद्यापही पूर्ण केले नाही. त्यामुळे उन्हाळ्यात भीषण पाणीटंचाई निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जलजीवन मिशन अंतर्गत काम करणाऱ्या कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी २६ जानेवारी रोजी ग्रामसभेने ठराव घेतला होता. त्यानुसार सदर कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करावी, यासाठी १० फेब्रुवारी रोजीपासून सरंपच, उपसरपंच, सदस्य यांच्यासह ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

गेल्या सहा दिवसांपसून सुरू असलेली हे उपोषण शासन दरबारी मात्र बेदखल असल्याने उपोषण कर्त्यामध्ये तीव्र रोष व्यक्त केला जात आहे. कंत्राटदाराच्या भ्रष्टवृत्तीमुळे वाकद येथील जनतेवर पाणीटंचाईची गंभीर समस्या ओढविली आहे.गावामध्ये सध्याच पाणीटंचाई निर्माण झाल्याने नागरिकांना ३०० ते ४०० रुपये टँकर प्रमाणे पाणी विकत घेण्याची वेळ आली आहे. उन्हाळ्यात पाणीटंचाई भीषण रूप धारण करण्याची शक्यता आहे.

या पाणीटंचाईवर कायमस्वरूपी तोडगा काढावा यासाठी कोट्यावधी रुपये खर्च करून २९ डिसेंबर २०२२ पाणीपुरवठा योजनेच्या कामाला कार्यारंभ आदेश देण्यात आले होते. या कामाला आता दोन वर्षाच्यावर कालावधी होत असतानाही सदर पाणीपुरवठा योजना सुरू झाली नाही, रोजी मात्र, गावात पाणीटंचाईची समस्या कायम आहे. अधिकाऱ्याच्या दप्तरी मात्र सदर पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास झाली असून त्याचे टेस्टिंग सुद्धा घेण्यात आले असल्याचे रिसोड उपविभागीय अभियंता यांच्या पत्रात नमूद केले आहे. मात्र, गावांमध्ये कोणताही पाणीपुरवठा करण्यात आला नाही.त्यामुळे शासनाची दिशाभूल करणाऱ्या अधिकारी व ठेकेदारावर कारवाई करावी व शासनाची दिशाभूल केल्याप्रकरणी व शासकीय निधीचा अपहार प्रकरण दंडात्मक कारवाई करावी, या मागणीसाठी वाकद येथील नागरिकांच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले आहे.

सदर उपोषणाला लहुजी शक्ती सेनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे, प्रदेशाध्यक्ष कैलास खंदारे, महिला जिल्हाध्यक्ष दुर्गा अनंता यंगड यांनी पाठिंबा देत जलजिवन मिशन योजनेचे कामाची चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना जिल्हा अध्यक्ष राजु किडसे (पाटील) वाकद गावातील सरपंच, उपसरपंच व नागरिकांनी जल जिवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा करण्यासाठी व दोषींवर कारवाई करावी या मागणीसाठी सुरू केलेल्या उपोषणाला पाठिंबा दिला आहे. तसेच वंचित बहुजन आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष ज्योती मिलिंद इंगळे व वंचित बहुजन आघाडी रिसोड युवा अध्यक्ष शेख तोसिफ यांनी जिल्हाधिकारी यांना निवेदन देत रिसोड तालुक्यातील वाकद येथील सरपंच, उपसरपंच यांच्या साखळी उपोषणास पाठींबा दिला आहे.

